पशु-आहार

# जनावरांसाठी समतोल आहार व्यवस्थापन




**डॉ. श्रीकांत खुपसे**
(मो.नं. ८६०५५३३३१५)
**डॉ. बी.एन. थोरात**
नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय,
गांधेली, जि. औरंगाबाद






जनावरांच्या खाद्याचे प्रामुख्याने हिरवे, कोरडे - वाळलेले किंवा खुराक आणि पेंढा या प्रकारे वर्गीकरण करण्यात येते. याचा विचार केल्यास, यांमधील सर्व खाद्यप्रकार जनावरांना देऊन त्यांना संतुलित आहार द्यायला हवा. त्याकरिता जनावरांना कमी खर्चामध्ये जास्त सकस अन्नघटक मिळतील, अशा प्रकारची खाद्ये तयार करुन घ्यावीत. असे केल्याने जनावरांना सकस आहार तर दिला जाईलच, परंतु खाद्यावर होणारा खर्च सुध्दा कमी करता येईल.

**भ**रपूर दुग्धोत्पादनासाठी सकस चारा उत्पादन व पुरवठा या दोन बाबी महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर दुधाळ जनावरांसाठी स्वच्छ पाण्याची उपलब्धता असणे सुध्दा गरजेचे आहे. एकूण उपलब्ध जमीन व पडीत जमिनीतून चाऱ्याचे गरजेएवढे उत्पादन होत नाही. तसे पाहता दुधाळ जनावरांच्या आहारामध्ये वैरणीचे फार महत्त्व आहे. हिरव्या तसेच संतुलित आहारामुळे दुधाळ जनावरांचे आरोग्य व कार्यक्षमता राखण्यास मदत होते. याच अनुषंगाने उत्तम दूध उत्पादनासाठी पशुसंवर्धनामध्ये आहार व्यवस्थापनाची माहिती येथे देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**सकस खुराक गरजेचा**

पशुसंवर्धनामधील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे आहार व्यवस्थापन हा होय. अधिक दूध उत्पादनाकरिता आहार हा महत्त्वाचा घटक असून, दुभत्या जनावरांवर होणाऱ्या एकूण खर्चापैकी ६० ते ७० टक्के इतका खर्च हा नुसता आहारावर होत असतो. नुसते खर्च करुन चालत नसून जनावरास दिला जाणारा आहार हा सकस तर असला पाहिजेच शिवाय तो योग्य प्रमाणात दिला गेला पाहिले. जनावरांना दिल्या जाणाऱ्या आहारावरील खर्चामध्ये जर कपात करावयाची असेल तर जनावरास सकस हिरवा चारा देणे गरजेचे असते. हिरवी वैरण ही सकस, लुसलुशीत व पालेदार असते. त्यातील प्रथिने, पिष्टमय घटक, क्षार व जीवनसत्त्वांमुळे इतर खाद्ये जनावरांना कमी प्रमाणात द्यावी लागतात.

**संतुलित खाद्य नियोजन गरजेचे**

जनावरांच्या खाद्याचे प्रामुख्याने हिरवे, कोरडे - वाळलेले किंवा खुराक आणि पेंढा या प्रकारे वर्गीकरण करण्यात येते. याचा विचार केल्यास, यांमधील सर्व खाद्यप्रकार जनावरांना देऊन त्यांना संतुलित आहार द्यायला हवा. त्याकरिता जनावरांना कमी खर्चामध्ये जास्त सकस अन्नघटक मिळतील, अशा प्रकारची खाद्ये तयार करुन घ्यावीत. असे केल्याने जनावरांना सकस आहार तर दिला जाईलच, परंतु खाद्यावर होणारा खर्च सुध्दा कमी करता येईल. जनावरामध्ये ऊर्जा निर्माण होण्याकरिता शर्करेची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे प्रथिनांचा चयापचय क्रियेमध्ये उपयोग होतो. परंतु प्रामुख्याने प्रथिनांचा उपयोग शरीरातील स्नायूंची वाढ व त्यांची झालेली झीज भरुन काढण्यासाठी होतो. जनावर गाभण अथवा दुधामध्ये जरी नसले तरी त्याला खाद्य देणे महत्त्वाचे असते. शरीर सुव्यवस्थित राखण्यासाठी खाद्याची आवश्यकता असते. जनावरास कोणत्याही प्रकारचे खाद्य देताना खाद्यामधून जनावरांच्या शरीरास पोषक तत्त्वे मिळतील याची काळजी घेतली पाहिजे. खाद्य पृथक्करण केले असता त्यामध्ये पाणी, प्रथिने, शर्करा, चरबी, पिष्टमय पदार्थ, खनिज द्रव्ये आणि जीवनसत्त्वे आढळतात. परंतु हे सर्व घटक ज्या प्रमाणामध्ये असतात त्या प्रमाणामध्ये जनावरांना उपलब्ध होत नाहीत. जे घटक जनावरांच्या शरीरामध्ये योग्य प्रकारे पचनसंस्थेद्वारा पचविले जातात तेच शरीरास मिळतात.

जनावरांना प्रामुख्याने दोन प्रकारचे खाद्य दिले जाते. एक म्हणजे शरीरस्वास्थ राखण्याकरिता आणि दुसरे म्हणजे उत्पादन वाढीसाठी. दोन्हीही खाद्ये ही खनिजे तसेच जीवनसत्त्वे योग्य प्रमाणात पुरविणारी असावीत. त्यामुळेच जनावरास संतुलित आहार दिल्यासारखे होईल. सर्वसाधारणपणे जनावरास त्याच्या वजनाच्या २ ते २.५ टक्के शुष्क पदार्थ द्यावयास पाहिजे. ढोबळ आकारमानाने ४०० किलो वजनाच्या गुरास १० किलो हिरवा चारा, त्याचप्रमाणे ६ ते ७ किलो वाळलेला चारा पुरेसा होतो. तसेच खाद्याचे प्रमाण हे नेहमी जनावराच्या वजनावर तसेच उत्पादनावर अवलंबून असते. त्याकरिता जनावरांचे वजन तपासणे जरुरीचे असते. जनावरांना हिरव्या वैरणीव्दारे कॅरोटिन हा घटक मिळतो. ज्याव्दारे जनावरांच्या शरीरास 'अ' जीवनसत्त्वाचा पुरवठा होत असतो. त्याचप्रमाणे हिरव्या तसेच कोरड्या चाऱ्यापासून जनावरांना खनिजांचा पुरवठा होत असतो. आपल्याला शक्य असल्यास खनिज मिश्रणाचा उपयोग जनावरांच्या खाद्यामध्ये करावा. तसेच काही धान्यांमध्ये त्याचप्रमाणे तेलवर्गीय पिकांमध्ये प्रथिनांचे व शर्करेचे प्रमाण बऱ्यापैकी असते. अशा प्रकारची खाद्ये, जसे- भुईमूग, ढेप, सरकी, मेझ ग्लुटेन सुध्दा जनावरांच्या आहारामध्ये समाविष्ट करावीत. जनावरांच्या योग्य वाढीकरिता व उत्पादन वाढीच्या दृष्टीने योग्य प्रमाणात प्रथिनेयुक्त त्याचप्रमाणे शर्करायुक्त खाद्य देणे जरुरीचे आहे.

**अप्रचलित खाद्यांचाही समावेश करावा**

दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज लक्षात घेता वैरण लागवडीखाली आधीच अत्यल्प असलेले क्षेत्र कमी होत आहे. काही अप्रचलित खाद्येसुध्दा शोधून काढली जात आहेत. त्याचप्रमाणे खुराकाच्या किंमतीमध्ये होत चाललेली वृध्दी ही सर्वसामान्य पशुपालकांना परवडण्यासारखी नाही. त्याकरिता खाद्यांच्या किंमतीमध्ये काटकसर करावयाची झाल्यास अप्रचलित खाद्यांचा जनावरांच्या आहारामध्ये समावेश करावा. मुख्यत्त्वेकरुन त्यात ऊसमळी, मोहफुले, आंब्याची कोय, मेझ ग्लुटेन, ऑरेंज पोमॅस इत्यादी असावेत. बांबूची कोवळी पाने, पिंपळाची पाने, चिंचेची पाने, कडुलिंबाची पाने, बोरीची पाने, शेळ्या- मेंढ्या तसेच गुरे आवडीने खातात. यांचा सुध्दा जनावरांच्या आहारामध्ये उपयोग केला जाऊ शकतो. अशा प्रकारच्या अप्रचलित खाद्यांचा वापर करुन जनावरांच्या खाद्यावरील खर्च कमी करण्याची गरज आहे. ■